# साकूर पठारभागाचा सिंचनाचा प्रश्न सोडविण्यासाठी बॅरेज बंधाऱ्यांचा पर्याय

## जलसंपदामंत्र्यांच्या बैठकीनंतर आमदार खताळ यांची माहिती



**संगमनेर (प्रतिनिधी)**– तालुक्याच्या साकूर पठारभागातील दीर्घकाळ प्रलंबित पाणी प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी मुंबई येथे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मंत्रालयातील दालनात विशेष बैठक पार पडली. या बैठकीत जलसंपदा विभागाने बॅरेज बंधाऱ्यांचा पर्याय समोर आणला आहे. या माध्यमातून साकूर पठारभागाचा पाणीप्रश्न कायमस्वरुपी मार्गी लागणार असून, गेल्या अनेक वर्षांपासून पाण्यावाचून वंचित असलेल्या पठारभागाला दिलासा मिळणार आहे, असे आ. अमोल खताळ यांनी सांगितले.

याबाबत बुधवारी (दि. ११) झालेल्या बैठकीत आमदार खताळ बोलत होते. भाजप तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य रऊफ शेख, रवी दातीर, ॲड. अमित धुळगंड यांच्यासह शिष्टमंडळ उपस्थित होते. संगमनेर तालुक्याच्या पठारभागातील मोरवाडी धरणाच्या संदर्भात अनेक वर्षांपासून या भागातील नागरिकांची मागणी होती. याआधी भूसंपादनही झाले होते, मात्र धरण न झाल्याने जमीन शेतकऱ्यांना परत देण्यात आली होती. २००४ मध्ये तत्कालीन पाटबंधारे राज्यमंत्री असताना कोणाच्या सांगण्यावरून न्यायालयाला पत्र देऊन जायकवाडीच्या खाली कुठलेही धरण होणार नाही असे लेखी हमीपत्र राज्य शासनाच्यावतीने दिले गेले होते. परंतु साकूर पठारभागासह तालुक्यातील पाणीप्रश्न कोणत्याही परिस्थितीत सोडवायचा असल्याने आ. खताळ यांनी यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आग्रह धरला आहे. यानुसार साकूर पठारभागासह तालुक्यातील निमोण व तळेगाव या सर्व दुष्काळी भागाचे नव्याने सर्वेक्षण करून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री यांनी दिल्याची माहिती आ. खताळ यांनी दिली आहे. तसेच सर्वेक्षण अहवाल आल्यानंतर पावसाळी अधिवेशनाच्या अगोदर पुन्हा एकदा बैठक घेऊन या भागातील या भागातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असा विश्वास दिला असल्याचे त्यांनी म्हटले.

निमगाव भोजापूर धरणाची उंची, पाणी नियोजन, व्यवस्थापन संदर्भात चर्चा झाली असून, त्यातून पाणी मिळवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. निळवंडे डावा व उजवा कालवा, तसेच राहठीचादरा येथे धरण बांधण्याच्या बाबतही विचार सुरू आहे. तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत पाणी मिळणारच आहे, असा ठाम विश्वास व्यक्त करत आ. खताळ म्हणाले. पाण्यापासून वंचित राहणाऱ्या सायखिंडी, कऱ्हे व इतर सर्व गावांचा सर्वे करून भविष्यात एकही गाव पाण्यावाचून वंचित राहणार नाही, यासाठी जलसंपदा मंत्री विखे पाटील आणि मी स्वतः प्रयत्नशील राहू, असा विश्वास आ. खताळ यांनी व्यक्त केला आहे.

# 'एआय'चा घातक वापर : महिला डॉक्टरांचे अश्लील व्हिडिओ तयार करून व्हाट्सॲपवर व्हायरल

**कराड** – कराडमधून एक धक्कादायक आणि अस्वस्थ करणारी घटना समोर आली आहे. शहरातील दोन नामांकित महिला डॉक्टरांचे एआय च्या माध्यमातून अश्लील व्हिडीओ बनवले गेल्याचं समोर आलं आहे. या व्हिडीओ बनावट असून, परराज्यातून तयार करण्यात आले असल्याचं प्राथमिक तपासात स्पष्ट झालं आहे. या प्रकारामुळे वैद्यकीय वर्तुळासह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

कराड शहर पोलीस ठाण्यात यासंदर्भात आयटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या गुन्ह्यामागचा सूत्रधार स्वतःला 'डॉक्टर' असल्याचं सांगतो, अशी माहिती तपासात समोर आली आहे.

पंधरा दिवसांपूर्वी दोन महिला डॉक्टरांनी कराड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार, सोशल मीडियावर त्यांचे अश्लील व्हिडीओ शेअर करण्यात आले होते. तपासाअंती हे व्हिडीओ एआय तंत्रज्ञानाने बनवले गेले असून, त्यात संबंधित डॉक्टर महिलांना दोन तरुणांसोबत आक्षेपार्ह कृती करताना



दाखवलं गेलं होतं. तपासादरम्यान पंजाबमधील विकास शर्मा या इसमाचा तपासात सहभाग निष्पन्न झाला असून, त्याने कबुल केलं की कराडमधीलच एक डॉक्टर राजेश शिंदे यानेच हे व्हिडीओ तयार करण्याची योजना आखली होती. पोलिसांनी दोघांचेही मोबाईल जप्त करून तपास सुरू केला आहे.

विकास शर्माने तपास अधिकाऱ्यांना सांगितलं की, आर्थिक अडचणीमुळे त्याने हे काम केलं. आरोपी राजेश शिंदे याने त्याला काही मोबाईल क्रमांक पाठवले व त्या नंबरचे गट तयार करून अश्लील व्हिडीओ पाठवण्यास सांगितले. यानंतर एआयच्या सहाय्याने खोटे व्हिडीओ तयार करून ते सोशल मीडियावर शेअर करण्यात आले. या बनावट व्हिडीओंमुळे संबंधित महिला डॉक्टरांच्या प्रतिष्ठेला मोठा धक्का बसू शकला असता, मात्र त्यांनी वेळेवर पोलिसांत तक्रार दाखल केल्यामुळे व्हिडीओ व्हायरल होण्याआधीच नियंत्रण मिळवता आलं.

कराड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू तहसीलदार यांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर क्राईम युनिटच्या मदतीने आरोपींचा ठावठिकाणा लावण्यात आला. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार व सहकारी दोघेही पोलिसांच्या ताब्यात असून, एआय तंत्रज्ञानाचा गैरवापर करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई केली जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

हा प्रकार म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाचा अतिरेक कसा घातक ठरू शकतो याचं ज्वलंत उदाहरण आहे. Deepfake AI तंत्रज्ञानाचा वापर करून कुणाच्याही फोटोवर अश्लील क्लिप्स तयार करता येतात. त्यामुळे सोशल मीडियावर आपले खाजगी फोटो, व्हिडीओ अपलोड करताना काळजी घेणं अत्यंत गरजेचं आहे.

# पिंप्रीवळण येथे वरातीत नाचण्याच्या कारणावरुन मारहाण

**राहुरी (प्रतिनिधी)**– वरात सुरू असताना नाचायला चल असे म्हणाल्याने आरोपींनी अजय पवार या तरुणाला शिवीगाळ करून लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. ही घटना राहुरी तालुक्यातील पिंप्री वळण येथे ६ जून रोजी रात्रीच्या सुमारास घडली आहे.

अजय भानुदास पवार (वय २६) रा. पवार वस्ती, खेडले परमानंद रोड, पिंप्री वळण, ता. राहुरी, या तरुणाने राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, पिंप्री वळण येथे ६ जून रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास वरात चालू असताना तेथे आरोपी दारू पिऊन आले होते. त्यावेळी अजय पवारने आरोपीला नाचायला चल असे म्हटले असता त्याला शिवीगाळ करून लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर ७ जून रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास अजय पवार आणि त्याची पत्नी त्यांच्या राहते घराच्या पाठीमागील शेतात घासाची भाजी घेत असताना तेथे आरोपी आले. त्यांनी काहीही न बोलता अजयला गलोरीच्या मुठीने मारून जखमी केले. तसेच लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. नंतर तू परत मला भेट, तुला जीवंत मारून टाकतो अशी धमकी दिली.

या प्रकरणी अजय भानुदास पवार यांच्या फिर्यादीवरून चेतन वसंत जाधव, रा. पिंप्री वळण, ता. राहुरी, आणि त्याचा मेव्हणा (नाव गाव माहीत नाही) या दोघांवर गु. र. नं. ६४७/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ३५२, ३५१ (२), ११५ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# केंद्र सरकारने एसीसाठी लागू केले नियम! आता २० डिग्रीहून कमी नाही होणार तापमान

**नवी दिल्ली**– देशभरातील हवामानाचा अंदाज लावणं फार कठीण आहे. कारण कधी सकाळी ऊन तर रात्री पाऊस, अशी परस्थिती भारतात निर्माण झाली आहे. या दमट वातावरणामुळे उष्णता प्रचंड वाढली आहे. उष्णतेच्या काळात लोकांचा सर्वात मोठा आधार म्हणजे एसी. आता केंद्र सरकारने एसीबाबतच काही घोषणा केल्या आहेत.

एसीचा वापर करणाऱ्या लोकांसाठी केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर यांनी एक मोठी घोषणा केली आहे. त्यांनी एक नवीन योजना सुरु करण्याचा विचार केला आहे. केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत सांगितलं आहे की, आता एसीचं तापमान प्रमाणित केलं जाणार आहे. त्यांनी म्हटलं आहे की, ऊर्जा संरक्षण, वीज वापरातील घट आणि पर्यावरण संतुलन लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री यांनी सांगितलं आहे की, आता नवीन एयर कंडीशनरचे कमीत कमी तापमान २० डिग्री सेल्सियस आणि जास्तीत जास्त तापमान २८ डिग्री सेल्सियस असणार आहे. घरे आणि कार्यालयांव्यतिरिक्त, हे तापमान कार एसींसाठी देखील निश्चित केले जाईल. त्यांनी सांगितले की याचा उद्देश अनावश्यक वीज वापर कमी करणे आहे. याशिवाय सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे पर्यावरण संतुलन राखण्यासाठी देखील मदत होणार आहे.

# अंनिसची आज अहिल्यानगरमध्ये बैठक

## नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा होणार सन्मान

**नेवासा(तालुका प्रतिनिधी)**– महाराष्ट्र अंनिसचे निर्वाचित अध्यक्ष अध्यक्ष माधव बावगे यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अहिल्यानगर जिल्ह्याची बैठक आज गुरुवार दि. १२ जून रोजी दुपारी २:३० वाजता हमाल पंचायत मार्केट यार्ड, अहिल्यानगर येथे होणार असल्याची माहिती जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड यांनी दिली.

बैठकीत महाराष्ट्र अंनिसचे निर्वाचित अध्यक्ष माधव बावगे, नवनिर्वाचित राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे, बुवाबाजी संघर्ष विभाग राज्य कार्यवाहपदी ॲड.रंजना गवांदे यांच्यासह स्व.सोपानराव दरंदले पत्रकाररत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सुखदेव फुलारी यांचा जिल्हा अंनिसच्या वतीने सन्मान करण्यात येणार आहे.



बैठकीमध्ये जिल्ह्यातील प्रत्येक शाखेने पुढील चार महिन्यात करावयाचे संघटनात्मक व उपक्रमात्मक कामकाज याबाबत अध्यक्ष माधव बावगे तसेच प्रधान सचिव डॉ.ठकसेन गोराणे हे मार्गदर्शन करणार आहेत. जिल्ह्यातील सर्व शाखांनी मागील चार महिन्याचा अहवाल तसेच पुढील चार महिन्यांचे नियोजन लेखी स्वरूपात अहवाल सोबत आणावेत, असे आवाहन जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा, जिल्हा सचिव देवदत्त साबळे व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांचे ढोल ताशाच्या गजरात स्वागत

**कोल्हार (वार्ताहर)**– प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कोल्हार येथील प्रवरा हायस्कूल या सीबीएसई विद्यालयाचा बुधवार यंदाच्या नवीन शैक्षणिक वर्षातील पहिला दिवस होता. दोन महिन्याच्या सुट्टीनंतर विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या शाळेमध्ये पाऊल ठेवले. यानिमित्ताने ढोल ताशाच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांना गुलाब पुष्प व खाऊचे वाटप करण्यात आले. कोल्हार येथील प्रवरा हायस्कूलच्या या अभिनव उपक्रमाचे पालकांकडून कौतुक करण्यात येत आहे.



कोल्हार येथील प्रवरा हायस्कूलचे शैक्षणिक वर्ष बुधवारपासून सुरू झाले. शाळेच्या पहिल्या दिवसाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या स्वागताने झाली. प्राचार्य सुधीर मोरे, शिक्षक योगिता करवा, एस. ई. कडू, पी. जे. काळे आदींनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यामुळे चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर हसू आणि समाधान उमटले. नवीन वातावरण, नवीन माणसे, सर्व काही नवीन वातावरणात चिमुकले विद्यार्थी वर्गात बसले. सूत्रसंचालन जी. व्ही. तांबे यांनी केले.

# राहात्यात ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीची बैठक उत्साहात

**राहाता (प्रतिनिधी)**– राहाता येथे ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीची बैठक रविवारी ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे सुभाष मुंडाळे योच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. शासनाच्या निर्णयासह विविध विषयावर यावेळी चर्चा करण्यात आली.

समन्वय समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी ज्येष्ठ नागरिक महासंघ राहाता तालुका समन्वय समितीची माहिती देताना तालुक्यामध्ये गाव तेथे ज्येष्ठ नागरिक संघटना स्थापन करण्याची माहिती दिली. शासन निर्णयाप्रमाणे गाव तेथे विरंगुळा केंद्र स्थापन करणे बाबत प्रयत्न करण्यात येतील तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या अध्यक्षतेखारी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये समिती तयार करून ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल. यासोबत अनेक शासनाच्या योजना ज्येष्ठापर्यंत पोहचवण्याचे काम समिती मार्फत करण्यात येईल, असे ज्ञानेश्वर चौधरी यांनी सांगितले.

याप्रसंगी ॲड, विजयराव जाधव यांनी समितीला कायदेशीर सल्ल्यासह मार्गदर्शन केले. प्रा. सुभाष पाथरकर यांनी साकुरी येथील संघामार्फत केलेल्या कामाबद्दल माहिती दिली. शेवटी समितीचे सचिव दगडू गोरे यांनी आभार मानले. यावेळी समितीचे उपाध्यक्ष गोरख मोटे, सचिव दगडू गोरे, सदस्य मच्छिंद्र गाढवे, ॲड विजय जाधव, शशिकांत निलखे, प्रा. सुभाष पाथरकर, सुभाष सुंडाळे, रामभाऊ मुजमुले, शंकर लहारे, प्रतिभा गोरक्ष, रामनाथ मैड आदी उपस्थित होते.

## पान १ वरुन

### मान्सूनची सीमा मुंबई...

पावसाचा यलो अलर्टदेण्यात आला आहे.

शुक्रवारपासून कोकणातही पाऊस वाढेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात गुरुवार, शुक्रवार आणि शनिवार तसेच रत्नागिरी जिल्ह्यात शुक्रवार आणि शनिवारी काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह जोरदार ते अतिजोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यातही पुढील पाच दिवस पावसाचा अंदाज देण्यात आला आहे.

मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्येही पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलक्या ते जोरदार पावसाचा अंदाज आहे.धाराशीव, लातूर, नांदेड, हिंगोली, बीड, परभणी, जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत पुढील पाच दिवस काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह जोरदार पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रातही पुढील पाच दिवस काही ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत पुढील पाच दिवस काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. उत्तर महाराष्ट्रात नंदुरबार, धुळे, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांतही काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

### नगर, शेवगाव, श्रीगोंदा, पाथर्डीत...

ठिकाणी विजेच्या ताराही तुटल्या. त्यामुळे विजपुरवठा खंडित झाला. वादळी वाऱ्यामुळे हातगाड्यांवर विक्री करणाऱ्या लहान व्यापाऱ्यांचे साहित्य भिजून नुकसान झाले. काही भागांत रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत झाली.

दरम्यान, दक्षिण जिल्ह्यातील शेवगाव, पाथर्डी व श्रीगोंदा तालुक्यांतील अनेक भागांतही पावसाने जोरदार हजेरी लावली. या भागांत वाऱ्याचा वेग अधिक असल्याने काही ठिकाणी शेतीच्या पीकांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. पारनेर, कर्जत, जामखेड तालुक्यांमध्ये देखील काही भागांत मध्यम ते हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला. गेल्या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने आधीच शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यानंतर आता पुन्हा पावसाने उपस्थिती लावल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. काही भागांत खरिपाच्या पेरण्यांच्या तयारीला वेग आला असला, तरी अचानक येणाऱ्या वादळी पावसामुळे नुकसान होण्याची भीती शेतकरी वर्ग व्यक्त करत आहे.

### सोनई, चांद्यातही तडाखा

झाली होती. वाहतूक सुरळीत करण्यासाठी तात्काळ जेसीबीच्या साह्याने वाहतूक सुरळीत करण्यात आली. काही ठिकाणी चार चाकी वाहनावर झाडे पडल्याने मोठे नुकसान झालेले आहे. कांगोणी गावात सरपंच सोमनाथ कराळे यांच्या घरावर लिंबाचे झाड व नव्या वांबोरी रोडवरील शिक्षक भागवत वीरकर यांच्या चार चाकी नव्या वाहनावर झाड कोसळले.

चांदा वार्ताहराने कळविले की, नेवासा तालुक्यातील चांदा-बऱ्हाणपूर परिसराला आज सायंकाळी झालेल्या प्रचंड वादळाने मोठे नुकसान झाले असून वादळासोबतच पाऊसही झाला आहे. सायंकाळी सात वाजता अचानक वादळाला सुरुवात झाली. या वादळाने या परिसरात शेकडो झाडे पडली तर वीज पुरवठाही खंडीत झाला. प्रचंड वादळाने अनेक भागात पोल पडल्याचा प्राथमिक अंदाज आहे वादळाने भुसऱ्यात ठेवलेले कांदाही अनेक ठिकाणी भिजले आहेत. काही घराचं नुकसान झाले असून या वादळाने किती नुकसान झाले या अंदाज घेण्याचा प्रयत्न ग्रामस्थ करत होते.

### एसईबीसी आरक्षणाला स्थगिती...

विरोधातील याचिकांमुळे उच्च शिक्षणातील मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना आरक्षण देण्यात अडचण येत असल्याचे समोर आले होते. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या वैधतेबाबतची नव्याने सुनावणी कालपासून मुंबई उच्च न्यायालयात होत आहे. त्यामुळे मराठा आरक्षण वैध ठरणार की नाही याची फैसला आगामी काळात होणार आहे.

दरम्यान, आता उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या नेतृत्वाखालील विशेष त्रिसदस्यीय पूर्णपीठ सुनावणी घेत आहे. सुरुवातीला प्रकरण अंतरिम दिलासासाठी घ्यायचं की अंतिम निर्णयासाठी यावर वकिल आणि न्यायमूर्ती यांच्यात युक्तीवाद सुरू झाला. यावेळी विरोधी वकिलांनी जोपर्यंत तारीख होत नाही तो पर्यंत स्टे द्यावा असा युक्तिवाद केला. यानंतर फायनल सुनावणीसाठी प्रकरण घेण्यात यावं असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. मराठा आरक्षणाच्या सुनावणीबाबत बोलताना महाराष्ट्राचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाला आधीच अंतरिम दिलासा आहे.मग पुन्हा सुनावणी घेण्यात अर्थ नाही, आता अंतिम सुनावणीला सुरूवात करायला हवी. यानंतर न्यायमूर्तींनी म्हटले की, मराठा आरक्षणाच्या विरोधात अनेक याचिका आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र बसून विरोधकांची बाजू नेमकं कोणं मांडणार हे ठरवा. यावर विरोधी वकिल प्रदीप संचेती यांनी म्हटले की, प्रत्येक याचिकाकर्त्याने विविध विषय वाटून घेतले आहे. प्रत्येकाला आपलं मत मांडायचं आहे. त्यामुळे प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार द्यायला हवा. यानंतर न्यायाधीश घुगे यांनी मराठी आरक्षणाची पुढील सुनावणी १८ जुलैला ३ वाजता आणि १९ जूलै रोजी पूर्ण दिवस चालेल, अशी माहिती दिली. त्यानंतर १९ जुलैला पुढची तारीख जाहीर केली जाणार आहे.

### संगमनेरातील कर्जुलेपठारला...

हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान रुपाली वाघ यांचा काल रात्री १२.३० च्या सुमारास मृत्यू झाला. मोनिका वाघ यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या घटनेनंतर अजित वाघ यांच्या फिर्यादीवरून मुरलीधर रामकृष्ण पडवळ, विक्रम मुरलीधर पडवळ आणि अलका विक्रम पडवळ (सर्व रा. कर्जुलेपठार) यांच्याविरुद्ध घारगाव पोलीस ठाण्यात ॲट्रोसिटीसह खुनाचा प्रयत्न, खून आदींसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीन ही आरोपींना पोलिसांनी अटक करुन न्यायालयापुढे हजर केले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास पोलीस उपाधिक्षक डॉ. कुणाल सोनवणे करीत आहे.

### जनावरांची कत्तल करणारी...

त्यांच्या वर्तनात बदल झाला नव्हता. त्यांच्या गुन्ह्यांमुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये भीतीचं वातावरण तयार झालं होतं.

सदर टोळीविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ अंतर्गत हद्दपारीचा प्रस्ताव सादर केला होता. उपविभागीय पोलीस अधिकारी, नगर ग्रामीण विभाग यांनी सखोल चौकशी करून प्रस्तावास शिफारस केली होती. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक तथा हद्दपार प्राधिकरण घार्गे यांनी सदर तिघांना अहिल्यानगर जिल्ह्यातून १ वर्षासाठी हद्दपार करण्याचे आदेश पारीत केले.

**जिल्ह्यात संघटित गुन्हे करणाऱ्या टोळ्यांविरूध्द कठोर पावले उचलण्यात येत आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या टोळ्यांची माहिती संकलित करून अशांवर हद्दपारीची कारवाई सुरूच ठेवली जाणार आहे. आणखी काही टोळ्यांचीही माहिती प्राप्त झाली असून लवकरच त्यांच्याविरूध्दही अशाच प्रकारची कारवाई केली जाईल.**

– **सोमनाथ घार्गे,** पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर

### राहुरी तालुक्यात अवैध खत...

नसल्याचे तपासणीतून उघडकीस आले आहे. त्यामुळे पंचसाक्षीदारांच्या उपस्थितीत पंचनामा करून संपूर्ण साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणात खत नियंत्रण आदेश १९८५ आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत तरतुदींचा भंग झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर ठिकाणी तत्काळ खत विक्री बंदी आदेश बजावण्यात आला असून, दोषींवर कायदेशीर कारवाई केली आहे.

**अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना गुणवत्तापूर्ण कृषी निविष्ठा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाचा कृषी विभाग कटिबध्द आहे. शेतकऱ्यांनी अधिकृत परवाना धारक कृषी सेवा केंद्राकडूनच खते, बियाणे व कीटकनाशके खरेदी करावीत. खरेदीच्या वेळी रीतसर पावती घेऊन ती जतन करावी. अशा प्रकरणांबाबत तक्रारी असल्यास कृषी विभागाशी थेट संपर्क साधावा.**

**–सुधाकर बोराळे,**
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अहिल्यानगर

### आषाढी वारीत दर्शन रांगेतील...

दर्शनाची रांग मंदिरापासून सात ते आठ किलोमीटर लांब जात असते. अशावेळी भाविक ३०-३० तास दर्शन रांगेत उभे राहत असतात. पण दर्शन रांगेत जास्त वेळ उभे राहावे लागू नये म्हणून अनेक भाविक ठिकठिकाणी दर्शन रांगेत घुसखोरी करत असतात. पण आता अशा भाविकांना दर्शन रांगेत घुसखोरी करता येणार नाही. कारण दर्शन रांगेला आतासहा फुटांच्या जाळ्या लावल्या आहेत.

दरम्यान, यावर्षी आषाढी वारीच्या कालावधीत होणाऱ्या गर्दीचे नियंत्रण आणि व्यवस्थापनासाठी या एआय तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. चैत्री एकादशी दिवशी याची चाचणी देखील पंढरपूर येथील बसस्थानक येथून घेण्यात आली होती. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, प्रशिक्षित आय.पी.एस अधिकारी अंजना कृष्णन, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, विक्रांत गायकवाड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, ड्रोन आयडीया फोर्चचे एजीएम आशिष माथूर उपस्थित होते. श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी वर्षाकाठी पंढरपुरात जवळपास दोन ते अडीच कोटी भाविक येत असतात. आषाढी यात्राकाळात मानांच्या पालख्यांसह अनेक दिंड्या पायी पंढरपूरला येत असतात. यात्रा काळात भाविकांना सुरक्षित आणि सुलभ दर्शन मिळावे, कुठेही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी प्रशासनाकडून एक महिना अगोदरच तयारी केली जाते.

### भोकर येथे बिबट्याच्या हल्ल्यात...

घडल्याचे समजताच त्यांचे चिरंजीव दीपक पवार यांनी श्रीरामपूर येथून येऊन आपल्या आईला उपचारासाठी श्रीरामपूर येथील साखर कामगार हॉस्पिटल, ग्रामीण रूग्णालय व तेथून लगेच अहिल्यानगर येथील शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. ही घटना घडल्याचे समजताच कोपरगाव येथील वनसंरक्षक श्री. रोडे, वनपाल विठ्ठल सानप यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक अक्षय बडे व विलास डगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन नातेवाईकांचे सांत्वन केले. भोकर परिसरात आता पर्यंत बिबट्याने तीन जणांना जखमी केले आहे.

या परिसरात बिबट्याच्या बंदोबस्तासाठी वन विभाग पिंजरा देत असला तरी या पिंजऱ्यात भक्ष्य ठेवण्यास शेतकरी धजावत नसल्याने हे प्रकार वारंवार घडत आहेत. यापूर्वी अंबादास ढोकणे, विशाल सुदाम दुधाळे यांच्यावर बिबट्याने हल्ला करत त्यांना जखमी केले होते. त्यानंतर आता पुन्हा काल मध्यरात्रीच्या सुमारास हनुमानवाडी येथील पुष्पा पवार यांच्यावर बिबट्याने केलेल्या हल्ल्याने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या बिबट्याचा त्वरीत बंदोबस्त करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल इशारा येथील गणेश कांबळे, सुनिल विधाटे, सागर अभंग व आप्पासाहेब जाधव यांच्यासह ग्रामस्थांनी दिला आहे.